**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८३/२०१३</u>**

**<u>नि. ९६  खालील आदेश</u>**

१.   अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम  ५ नुसार दाव्यात अतिरिक्त मुद्दा काढण्यासाठी दिलेला आहे.

२.   प्रतिवादींचे अर्जातील कथन की, वादीने सदरचा दावा दिनांक ०६/०४/१९९१ रोजीच्या कराराप्रमाणे दावा मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत होवून मिळण्यासाठी, प्रतिवादींनी तसे खरेदीखत लिहून न दिल्यास ते न्यायालयामार्फत लिहून मिळण्यासाठी व दावा मिळकतीचा वादी हा विरूध्द कब्जाने मालक झाला आहे या ठरावासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीने कैफियतीत दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी प्रतिवादींची नांवे दिनांक २३/०३/१९९१ रोजी आत्माराम सोनुर्लेकर यांचे कायदेशीर वारस म्हणून वारस नोंदवही उतारा क्र. ४४ ला नोंद झाली व त्याप्रमाणे फेरफार क्र. ११९ योग्य प्रकारे झालेला आहे. त्यामुळे दिनांक ०६/०४/१९९१ रोजीचा करार बोगस, बेकायदेशीर व विनाअंमलपात्र असून प्रतिवादींवर बंधनकारक नाही असा मजकूर समाविष्ट केला आहे. प्रतिवादींच्या नांवाची नोंद दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी असल्यामुळे व करारावर प्रतिवादींच्या स्वाक्ष—या नसल्यामुळे त्यांनी तो करार वादीला लिहून दिलेला नाही व वादीच्या सर्व मागण्या अमान्य केलेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी दाव्यात ‘‘वादी शाबित करतात का की, दिनांक ०६/०४/१९९१ रोजी श्रीमती राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर हिने लिहून दिलेला करार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यावर बंधनकारक आहे ? ’’असा अतिरिक्त मुद्दा काढण्याची मागणी केली आहे.

३.   वादीने म्हणणे नि. ९७ देवून अर्जाला सक्त हरकत घेतली आहे. त्यांनी अर्जात प्रतिवादींच्या मागणीप्रमाणे त्यांनी दाव्यात प्रतिवादी क्र. ४ ला समाविष्ट केले आहे. वादीने दाव्यात नि. ७४ सोबत दाखल केलेले प्रतिवादींनी त्यांचे पूर्वाधिकारी हिला दिनांक ०५/१२/१९९१ रोजी करून दिलेले हक्कसोडपत्र कुळवहिवाट दाव्यात जोडलेले आहे व त्यामुळे त्या कुळवहिवाट दाव्यात आदेश झालेला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

४.   दावा, कैफियत पहाता प्रतिवादींनी वर अर्जात नमुद केलेल्या कारणास्तव वादीने दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी कैफियतीमध्ये वर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकत ही त्यांचे वडील आत्माराम सोनुर्लेकर यांच्या मालकीची होती. ते सन १९८२ मध्ये मयत झाले. त्यांच्या मृत्युनंतर प्रतिवादी व आत्माराम सोनुर्लेकर यांची पत्नी राधाबाई यांचा हक्क दावा मिळकतीत आहे. वारसांची नोंद वारस उतारा क्र. ४४ नुसार होवून त्यामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ३  व त्यांची आई राधाबाई यांच्या नांवाची नोंद आत्माराम सोनुर्लेकर यांचे वारस म्हणून झालेली आहे व त्याबाबतच फेरफार नोंद क्र. ११९ दिनांक २८/०३/१९९१ रोजी झालेला आहे. दावा मिळकत वडिलोपार्जित मिळकत आहे. अशा प्रकारे कैफियतीत त्यांनी हरकत घेतलेली आहे.

५.   दाव्यातील कथनानुसार दिनांक ०६/०४/१९९१ रोजीचा करार हा दाव्याचा प्रमुख मुद्दा आहे. प्रतिवादींनी दावा मिळकत वडिलोपार्जित मिळकत असून राधाबाई व प्रतिवादी या सगळयांची दावा मिळकतीला नांवे असतांनाही राधाबाईने एकटीनेच करार करून दिला, त्यामुळे तो करार प्रतिवादींवर बंधनकारक नाही अशा आशयाची हरकत उपस्थित केलेली आहे तसेच करारसुध्दा त्यांना मान्य नाही अशीसुध्दा हरकत उपस्थित

केलेली आहे. त्यामुळे कैफियतीतील कथनानुसार व दावा हा प्रामुख्याने दिनांक ०६/०४/१९९१ रोजीच्या करारावर अधारीत असल्यामुळे प्रतिवादींनी मागणी केलेला मुद्दा दाव्याचा गुणदोषावर निर्णय देण्यासाठी दाव्यात काढणे आवश्यक असल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी मागणी केलेल्या मुद्दयाप्रमाणे दाव्यात काढलेले मुद्दे नि. ४४ मध्ये मुद्दा दिसून येत नाही. सबब वरील बाबींचा विचार करता दाव्याचा गुणदोषावर व योग्य निर्णय होण्यासाठी प्रतिवादींनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे अतिरिक्त मुद्दा काढणे न्यायोचित दिसून येते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज मंजूर केला.

२. दाव्यात खालीलप्रमाणे अतिरिक्त मुद्दा काढण्यात येत आहे.

‘वादी शाबित करतात का की, दिनांक ०६/०४/१९९१ रोजी श्रीमती राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर हिने लिहून दिलेला करार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यावर बंधनकारक आहे ? ’’

सही/—
(एम्. एस्. बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.

दिनांक :— १०/०४/२०१८.